सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-अ

वर्ष ३, अंक ७३] गुरुवार, फेब्रुवारी २, २०१२/माघ १३, शके १९३३ [पृष्ठे ३

किंमत : रुपये १४.००

## असाधारण क्रमांक ११

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिध्द केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३१ जानेवारी २०१२

### अधिसूचना

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५.

क्रमांक केंमाअ २००८/१०१०/प्र.क्र. ३५६/०९/सहा. - माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) याच्या कलम २७, पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :-

(१) या नियमांना, महाराष्ट्र माहितीचा अधिकार (दुसरी सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

(२) महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ च्या नियम ३ क नंतर पुढील नियम ज्यादा दाखल करण्यात येईल :-

``३ ख. **अभिलेख तपासण्याकरिता त्याची मागणी करण्याची कार्यपध्दती.**- कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये अभिलेख तपासण्याकरिता त्याची मागणी करण्यासाठी अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जावर विचार करण्यात आल्यावर, जन माहिती अधिकाऱ्यास सदर अर्ज योग्य असल्याचे आढळून आल्यास, अर्जदारास अभिलेख तपासण्याकरिता परवानगी देण्यात येईल आणि जर अशी परवानगी त्याला मिळाली तर जन माहिती अधिकारी, अवलोकनार्थ अर्जदाराला पाहिजे असलेल्या अभिलेखांची विभागाच्या संबंधित कक्षाकडून मागणी करील आणि तो अभिलेख आपल्या उपस्थितीत किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत, कार्यालयीन वेळेत अर्जदारास देईल. अशा अभिलेख्यांची तपासणी करताना, अर्जदारास केवळ पेन्सिलचा वापर करण्याची परवानगी राहील आणि अर्जदारास पाहिजे असलेली माहिती त्याला पेन्सिलीनेच टिपून घेता येईल. जर अर्जदाराने पेन्सिल व्यतिरिक्त अन्य कोणतेही लेखनसाहित्य आणले तर तो ते लेखनसाहित्य जन माहिती अधिकाऱ्याकडे जमा करील, आणि त्यानंतर त्याला अभिलेख तपासण्याची मुभा देण्यात येईल. अर्जदाराला तपासणीच्या वेळी जी पेन्सिल वापरण्याची मुभा देण्यात आलेली असेल, त्या पेन्सिलीने अभिलेखावर कोणत्याही प्रकारची खूण करता येणार नाही.``

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नंदकुमार जंत्रे,
शासनाचे सचिव.